MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता (TM)

**Jan. To March 2022**
**Issue 41, Vol-10**

**Date of Publication**
**01 March 2022**

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg No U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
**All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com**

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

Jan. To March 2022
Issue-41, Vol-10



20

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रविषयक दृष्टीकोण

प्रा. डॉ. आर. डी. खताळ
समाजशास्त्र विभाग,
कला आणि विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर
गढी ता.गेवराई जि.बीड

***********

**प्रस्ताविक :**

भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या नवीन भारत निर्मितीत आणि घटना समितीचे प्रमुख म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मोलाचे ठरते. समाजातील दिनदुबळ्यांचे अपार दुःख, अमानुष छळ, दुर्धर समस्या सोडविण्यासाठी त्यांनी जीवनभर संघर्ष केला. त्यांच्या विचारातून दलित आणि बहिष्कृत भारताचे सम्यक दर्शन घडते. आधुनिक भारतीय विचारांच्या जडणघडणीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सिंहाचा वाटा आहे. देशातील सत्तर लाखाहून अधिक दलितांना समान प्रतिष्ठा मिळावी हा आग्रह त्यांच्या सामाजिक विचारातून दिसून येतो. त्यांनी भारतीय सामाजिक श्रेणीतील सर्वात कनिष्ठ अशा स्तरावर आपले लक्ष केंद्रीय केले व त्यांच्या हक्कासाठी प्रस्थापितांविरुध्द लढा दिला. कुशाग्र बुध्दीमत्ता, अभ्यासाची आवड असणारे दलितांचे कैवारी आणि अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास या विषयांचा त्यांचा अभ्यास होता. तसेच एक श्रेष्ठ न्यायपंडित कुशल कायदेपंडित व आघाडीचे बुध्दीमान राजकीय नेते म्हणून त्यांची ओळख आहे. भारतातील सामाजिक, राजकीय, धार्मिक व वैचारिक क्षेत्रात आपल्या विद्वत्तेने व कर्तृत्वाने दैदिप्यमान होणारा क्रांतीसूर्य म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी परंपरागत रुढीग्रस्त जातीनिष्ठ अशा भारतीय समाजाला सामाजिक क्रांतीचे तत्वज्ञान दिले आणि भारतीय समाज सुधारकाचा शूद्रविषयक दृष्टीकोन हा त्यांच्या प्रमुख विचारांपैकी एक मानला जातो.

स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात आंबेडकरांना कायदामंत्री होण्याचा बहुमान मिळाला असला तरी त्या पदावर ते म्हणावे तसे समाधानी राहू शकले नाहीत. सदरच्या मंत्रिमंडळात आपली उपेक्षा केली जात असून आपल्याला एका गौण स्थानावर विराजमान करण्यात आले याची त्यांना जाणीव झाली होती. म्हणून ते नाराज होते. हिंदू कायद्याचे संहितीकरण होणे हे या समाजाच्या एकत्रीकरणासाठी आवश्यक आहे अशी त्यांची धारणा होती.

**संशोधनाचे उद्दिष्ट :**

➤ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शूद्रविषयक दृष्टीकोन या संशोधन पेपरसाठी खालील उद्देश निश्चित करण्यात आला.

➤ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शूद्रविषयक दृष्टीकोन अभ्यासणे.

**संशोधनाचे गृहितके :**

➤ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शूद्रविषयक दृष्टीकोन या संशोधन पेपरसाठी खालील गृहितके निश्चित करण्यात आले.

➤ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शूद्रविषयक दृष्टीकोन या विचारांना त्यांच्या विचारसरणीत प्रमुख मानले जाते.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शूद्रविषयक दृष्टीकोण :**

भारतीय समाजाची रचना ही जाती व्यवस्थेवर आधारित असून जातीला धर्माचा आधार मिळाला होता. संपूर्ण समाज व्यवस्थेत वर्णव्यवस्थेला अधिक महत्व मिळाले होते. त्यामुळेच अस्पृश्यता समाज मान्य झालेली होती. अस्पृश्यता/शूद्रता ही सामाजिक विषमतेचा अंक आहे. एक वर्ग दुसऱ्या वर्गाला शूद्र/अस्पृश्य मानत असल्याने कनिष्ठ जातीतील लोकांचे जीवन असह्य आणि अत्यंत कष्टप्रद बनले होते. वर्णव्यवस्थेतील शूद्रांना मिळालेल्या कनिष्ठ स्थानाच्या बाबतीत आंबेडकरांनी प्रखर विरोध केला. वर्णव्यवस्थेमुळे हिंदू समाजाचे पराकोटीचे नुकसान झाले आहे असे आंबेडकरांचे मत होते. वर्णभेदाची तीव्रता एवढी भयानक होती की, कनिष्ठवर्गीय लोकांना जगताही येत नव्हते. कारण वरिष्ठवर्गीय लोक त्यांचा पराकोटीचा छळ करीत होते. परंतु उच्चवर्णियांची मुले जेव्हा परदेशात जात तेव्हा त्यांना हिनतेची वागणूक मिळत होती. म्हणून ते येथील लोकांबद्दल तिरस्काराने बोलत असत जेव्हा या लोकांना अशा प्रकारची जी वागणूक मिळत होती. तेव्हा भारतातील शूद्र लोकांनी ते कसे वर्तन करतात याची त्यांना का आठवण येऊ नये याचा आंबेडकरांनी आपल्या ३ जून १९२७ च्या बहिष्कृत भारत मध्ये खरपूस समाचार घेतला ते म्हणतात की, एकेकाळी हिंदू लोकांत परदेशगमन निषिध्द मानले जात असे पण परदेश गमन करुन मोठमोठ्या पदव्या मिळवून परत आलेल्यांची जी इच्छा होती तशी आपली व्हावी म्हणून प्रायश्चिताला न भिता हिंदुस्थानातील अनेक विद्यार्थी परदेशी शिक्षणाचा आस्वाद घेण्यासाठी परदेशगमन करतात त्यातील बरेच परदेशात जातात. जेथे जेथे विश्वविद्यालये आहेत तेथे तेथे विखुरलेले असतात. त्यापैकी एडिनबरो येथे राहत असलेल्या हिंदी विद्यार्थ्यांनी नुकतेच प्रसिध्द केले आहे की, तेथील रहिवाशी

त्यांना अस्पृश्याप्रमाणे वागवितात, ही परदेशी जाणारी मुले म्हणजे बऱ्याच अंशी श्रीमंतांचीही असतात त्यांनी खेळत-खेळतच अभ्यास करावयाचा असतो. तशाच प्रकारची त्यांची वागणूक असते. त्यांच्याबद्दल फारशी सहानुभूती वाटण्याचे कारण नाही. शिवाय वर्णभेदावर जगणाऱ्या लोकांनी वर्णभेदा विरुध्द तक्रार केली तर त्यांची दाद कोण घेणार? हिंदुस्थानातील गोरे स्पृष्य व काळे अस्पृश्य हा तरी वर्णभेद यांचाच आहे हा वर्णभेद यांना इतका मानवलेला आहे की, अस्पृश्यांना स्पृश्यांच्या कोणत्याच बाबतीत थारा मिळत नाही हा अन्याय आहे असे अनेक लोक केव्हाच कबुल करीत नाहीत. मग इथलाच वर्णभेद परदेशात आणि इथूनच दिलेल्या वर्णाश्रमी लोकांच्या पदरात घातला गेला तर त्याबद्दल तक्रार करण्यात यावी? वर्णाश्रम उत्तम आहे. त्याचा प्रसार हिंदुस्थानाच्या बाहेर होत आहे. त्याबद्दल हिंदू धर्माभिमान्यास नको का आनंद व्हायला? वर्णाश्रमावर वाढलेल्या या पोरांना वर्णाश्रम व्यवहारात आलेला पाहून संताप यावा ही मोठी नवलाईची गोष्ट आहे पहिला नंबर लागत असेल तर वर्णाश्रम हवा पण शेवटचा लागत असेल तर नको असा काही प्रकार नसेल ना? हिंदुस्थानात पहिला नंबर लागला अशी आशा धरुन वर्णाश्रमाच्या आग्रह धरणाऱ्या लोकांना आता जर अक्कल आली तर येईल.

इंडो-आर्यन समाजातील शुद्र आणि हिंदू धर्मातील शुद्र यातील फरक करतांना डॉ.आंबेडकर म्हणतात की, हिंदू समाजातील शूद्र हे इंडो-आर्यन समाजातील शुद्रांचे वांशिक दृष्टीने वारस नव्हते. इंडो-आर्यन समाजातील 'शुद्र हे एक समाजाचे नाव होते. हिंदू समाजामध्ये 'शुद्र हा शब्द कनिष्ट-असंस्कृत अशा समाजाचे द्योतक म्हणून वापरण्यात येत असतो. आर्यांच्या समाजातील शुद्र आणि नंतरच्या हिंदू समाजातील शुद्र यांचा परस्पर असा काहीच संबंध नव्हता. ऋग्वेदकाळात सुध्दा ब्राम्हण हा एक निराळा धर्मच होता. त्याने आपण उच्च दर्जाचे आहोत अशी सतत जाणीव ठेवली होती. आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी ते आंत्यंतिक जागरुक होते. उपनयन करणे हा कुटूंबाच्या उपाध्यायाचा खास असा हक्कच झाला होता. उपनयन न करण्यामुळे आपल्या भावी सामाजिक दर्जावर काय आणि कसे परिणाम होतील याचे आकलन शुद्रांना झाले नाही. ब्राम्हणांच्या खास अधिकाराविरुध्द समाजात आघाडी उघडली गेली नाही आणि क्षेत्रिय राजांनी तर शुद्रांबद्दल सहानुभूती दाखविण्याबाबत कष्टही घेतले नाहीत. त्यामुळे समाजात शुद्रांना मान-सन्मान तर मिळालाच नाही पण उलटपक्षी अधिकच त्रास आणि मानहानी सहन करावी लागली. कालानंतराने यात काही सुधारणा होण्याऐवजी अधिक कडक निर्बंध आले. त्यामुळे समाजातील शुद्रांचे जीवन अधिकच दयनीय बनत गेले.

समाजातील अस्पृश्यतेचे वर्णन करताना श्री.शंकरराव खरात म्हणतात, भारतात अस्पृश्यतेच्या भयानक गुलामगिरीत कोटयावधी जीव खितपत पडलेले आहेत. अस्पृश्यतेच्या आगीत मानवाचे दैनंदिन जीवन शेकडे वर्षापासून होरपळत होते. त्यामुळे अस्पृश्य व्यक्ती जिवंत असूनही मृतवत होती. मानुसकी आणि मानुसकीचे हक्क याला अस्पृश्य कायमचा मुकला होता. अस्पृश्यतेच्या भयंकर व भेसुर गुलामगिरीमुळे हा वर्ग सामाजिकदृष्टया हीन बनला होता. आर्थिकदृष्टया दरिद्री झाला होता. राजकीयदृष्टया वरिष्ठांचा सेवक,चाकर बनला तर शिक्षण व संस्कृतीपासून तो कायमचा दूर फेकला होता त्यांचे सर्वच मानवी हक्क हिरावून घेतले होते.

डॉ. आंबेडकरांच्या मते भारतीय समाजात अस्पृश्य मानल्या गेलेल्या शुद्रांची संख्या ही सहा कोटीवर असूनही त्यांना हीन व तिरस्काराची वागणूक दिली जाते. त्यांची वसतीस्थाने गावाबाहेर असून त्यांना गावाच्या विहिरालाही स्पर्श करण्यास मनाई होती. धार्मिक क्षेत्रात मंदिरे, देवस्थाने येथे त्यांना प्रवेश नाकारला होता. शिक्षणाची दारे तर पूर्णत: बंद होती. व्यवसाय देखील खालच्या प्रतीचा करणे क्रमप्राप्त होते. त्यांच्या सावलीचाही विटाळ मानला जाई. वेद, मंत्रोच्चार श्रवण करण्याची देखील मुभा नव्हती. त्यामुळे शुद्राचे/अस्पृश्यांचे समाजातील जीवन मातीमोल झाले होते. त्यांचे जीवनसुत्र अनेक प्रकारच्या अलिखित व अतुलनीय अशा अनिष्ठ निर्बधांनी जखडून टाकले होते. त्यांचा वेश, आहारविहार, भांडी, इतरांशी वर्तणूक, दागिने, याबाबतही कमालीचे निर्बंध होते. गावाबाहेरील ओसाड, रोगीट अशा उकिरडायवर त्यांच्या झोपडया असत. अंगभर वस्त्र नाही, निवाऱ्यासाठी जागा नाही अशा कंगाल स्थितीत या दिनदुबळयांना जीव मुठीत घेवून जीवन जगावे लागत होते. केवळ लज्जा रक्षणापुरते कपडे स्त्रियांना मिळत असत. मुलांना व पुरुषांनाही अगदी तोकडया कपडयावर राहवे लागे. अशा अनेक बंधनामुळे हा समाज पूर्णत: माणुसकीला पारखा झाला होता. भारतीय समाजाचा घटक असूनही अनिष्ठ रुढी, परंपरामुळे त्यांचे जीवन जगणे अत्यंत क्लेषदायक बनले होते. पण या समाजाच्या घटकांचे इतरांना काहीही देणेघेणे नव्हते. म्हणून हा समाजाचा घटक असूनही अलिप्त आणि क्लेषदायक जीवन जगत होता.

**समारोप :**

अशाप्रकारे समाजातील शुद्रांच्या/अस्पृश्यांच्या प्रगतीकरीता त्यांना कायद्याने संरक्षण दिले पाहिजे ही मुळ विचारसरणी डॉ.आंबेडकरांनी मांडली. त्यासाठी आयुष्यभर सर्व आघाड्यावर स्वत: व आपल्या स्वतंत्र संघ सेवा संस्थामार्फत प्रयत्न केले. अस्पृश्यांचा प्रश्न सोडवितांना इतर मार्गांबरोबरच त्यांना आपली

पचनी करु शकणार नाही असे त्यांनी सांगितले. डॉ.आंबेडकरांचा शूद्र अस्पृश्यता व त्यांचा उध्दार या संबंधीतचा दृष्टीकोण लोकशाही समाजरचना निर्माण करावयास पोषक आहे. त्यांनी आपल्या सामाजिक विचाराव्दारे, अस्पृश्यते विषयीच्या दृष्टीकोणाव्दारे या वर्गाला स्वतंत्र विचार-सरणीचा समता, बंधुतेचा मार्ग दाखविला नसता तर आजचा अस्पृश्य वर्ग फार तर सत्ताधाऱ्याचा सुधारक 'गुलाम' म्हणून जगला असता पण तो विचाराने मनाने, कृतीने कधीही स्वतंत्र झाला नसता अशाप्रकारे वास्तविक जाती-जातीची विषमता मोडून समपातळीत एकजीन्सी समाज निर्माण करण्याचे लोकशाहीचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शुद्राविषयीच्या दृष्टीकोणाने केले.

संदर्भसूची :


१. मुलभूत सामाजिक विचार प्रा.ज्योती डोईफोडे
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर डॉ.बा.ना.कुबेर
३. समाजशास्त्रीय विचार परंपरा प्रा.नी.स.वैद्य
४. सामाजिक विचारधारा रविंद्रनाथ मुखर्जी
५. प्रमुख समाजशास्त्रीय विचारक एस.एल.दोषी/पी.सी.जैन
६. डॉ.बाबासाहेब आंबेडकर धनंजय कीर
७. आधुनिक जग डॉ.पी.जी.जोशी
८. अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम शंकर खरात


⌘⌘⌘